|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**संलग्नता विभाग**

**जा.क्र.कबचौउमवि /5/Addl.Intake SY-TY-21-22/308/2021** **दिनांक: 29/09/2021**

## अत्यंत महत्वाचे

**प्रति,**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत कला, वाणिज्य, विज्ञान व समाजकार्य महाविद्यालयांचे मा.प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक यांना..**

**विषय:- शैक्षणिक वर्ष 2021-22 करिता पदवी व पदविका स्तरावरील व्दितीय वर्ष व तृतीय वर्षाच्या वर्गास प्रवेक्ष क्षमता वाढवून देणेबाबत व अतिरीक्त संलग्नता शुल्का बाबत..**

**संदर्भ :- प्रवेश व पात्रता विभागाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/6 प्र.पा./75/2021 दि. 23/08/2021 चे पत्र.**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरुन विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयाचे मा.प्राचार्य / परिसंस्थेचे मा.संचालक यांना कळविण्यात येते की, मा.विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने दि. 23/08/2021 रोजीच्या पत्रान्वये प्रवेश व पात्रता विभागाने पत्रात नमूद केल्याप्रमाणे मा.विद्या परिषदेच्या वतीने विद्यापीठाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

***"अंतिम वर्षातील व अंतिम सत्रातील विद्यार्थी व्यतिरीक्त इतर विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश द्यावा व बॅकलॉग असलेले विषय कॅरीफारवर्ड होतील."*** असे असे परिपत्रकाव्दारे महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे.

मा.विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष 2021-22 या वर्षासाठी प्रवेशास पात्र करण्यात आलेले विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी मंजूर तुकडी व मंजूर विद्यार्थी संख्या पेक्षा जास्तीचे विद्यार्थी प्रवेश देणे क्रमप्राप्त असून प्रवेशापासून एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही यादृष्टीने मा.अधिष्ठाता मंडळाने दि. 22/09/2021 रोजीच्या ऑनलाईन सभेत खालीलप्रमाणे निर्णय घेतलला आहे त्यानुसार कार्यवाही करावी.

अ) अंतीम वर्षाचे विद्यार्थी वगळता इतर सर्व अभ्यासक्रमातील विषयांमध्ये अनुत्तीर्ण असलेल्या अशा सर्व विद्यार्थांना पुढील शैक्षणिक वर्षात / सत्रात प्रवेशासाठी पात्र केलेले आहेत. ***त्यामुळे शैक्षणिक वर्ष 2021-22 करिता व्दितीय व तृतीय वर्ष वर्गाच्या कला,वाणिज्य व विज्ञान तसेच बी.बी.ए., बी.बी.एम. बी.बी.एस.,बी.एम.एस.,(ई कॉमर्स) बी.सी.ए., आणि बी.एस.डब्लू, ( समाजकार्य ) या पदवी व पदवीका अभ्यासक्रमासाठी प्रवेशीत होणा-या विद्यार्थांची संख्या ही मंजूर तुकडी व मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीची होणार आहे.*** मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीचे प्रवेशीत होणारी प्रवेश संख्या ही अतिरिक्त समजण्यात येईल.

अतिरिक्त प्रवेशीत होणा-या विद्यार्थ्यासाठी विद्यापीठाने दिनांक 15/10/2009 रोजी जाहिर केलेल्या सुधारित अध्यादेश 172( Direction 3/2008)मध्ये नमूद केल्या नुसार खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अतिरिक्त संलग्नता शुल्क हे एक रकमी (One Time) संलग्नीत महाविद्यालये /परिसंस्थे कडून जमा करण्यात यावे.

Additional Affiliation Fee for additional Students for the Academic Year 2020-21

Second and Third Year BA/B.Com./ B.Sc. (Additional Division)

| Sr.No. | Year | First Year | Second Year | Third Year | Affi.Fee | Total Fee |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | II$^{nd}$ Year | --- | S.Y. | | 2000 | 2000/- |
| 02 | III$^{rd}$ Year | --- | --- | T.Y. | 2000 | 2000/- |

Second & Third Year (BBM) (B.B.S./B.(e.com.) B.B.A./BCA/BMS (e.Com)

| Sr.No. | Year | First Year | Second Year | Third Year | Affi.Fee | Total Fee |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | II$^{nd}$ Year | --- | S.Y. | | 8000 | 8000/- |
| 02 | III$^{rd}$ Year | --- | --- | T.Y. | 8000 | 8000/- |

Second & Third Year BSW (Additional Division)

| Sr.No. | Year | First Year | Second Year | Third Year | Affi.Fee | Total Fee |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | II nd Year | --- | S.Y. | | 5000/- | 5000/- |
| 02 | III rd Year | --- | --- | T.Y. | 5000/- | 5000/- |

(ब) वरील निर्णय फक्त व्दितीय,तृतीय वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी 2021-22 या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच लागू राहील.

वरील प्रमाणे निर्णयाची नोंद घेवनू त्याप्रमाणे कार्यवाही करावी ही विनंती तसेच इतर अटी खालील प्रमाणे बंधनकारक राहतील.

01) **वाढीव प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांनी अतिरीक्त संलग्नता शुल्क कोणत्याही सबबीवर वसुल करण्यात येवू नये.** या संदर्भात विद्यापीठाकडे तक्रार प्राप्त झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य यांची राहील.

02) शैक्षणिक वर्ष 2021-22 करीता वाढीव /अतिरीक्त विद्यार्थ्यांचे अतिरीक्त संलग्नता शुल्क विद्यापीठाच्या संलग्नता विभागामार्फत वित्त विभागात जमा केल्यानंतर मा.समन्वयक, विद्यार्थी ई-सुविधा केंद्र यांना अतिरीक्त विद्यार्थी संख्येबाबत संलग्नता विभागामार्फत कळविण्यात येईल व त्यानंतरच वाढीव प्रवेशांची नोंद ई-सुविधेच्या ऑनलाईन पध्दतीव्दारे करण्यात येईल.

03) महाविद्यालयास अतिरीक्त संलग्नता शुल्क कोणत्याही सबबीवर किंवा कारणास्तव परत केली जाणार नाही किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या शुल्कात (Fee) मध्ये समायोजित केली जाणार नाही.

04) मागील शैक्षणिक वर्षात वाढीव मंजूर केलेल्या अतिरीक्त प्रवेशाची अचूक गणना करता यावी यासाठी मागील शैक्षणिक वर्षात संलग्नता विभागामार्फत अतिरीक्त प्रवेशाबाबत महाविद्यालयास निर्गमित करण्यात आलेल्या पत्रांची व अतिरीक्त संलग्नता शुल्क भरणा केल्याच्या पावतीची छायांकित प्रत वाढीव प्रवेश क्षमतेच्या प्रस्तावा सोबत सादर करणे आवश्यक राहील.

05) ज्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष 2021-22 करीता शासनाने अतिरीक्त तुकडी मंजूर केलेली आहे व विद्यापीठाने संलग्नता देवून विद्यार्थी प्रवेशित करण्यास परवानगी दिलेली आहे. अशा महाविद्यालयांनी अतिरीक्त विद्यार्थी नव्याने मंजूर करण्यात आलेल्या अतिरीक्त तुकडी मध्ये वर्ग करावेत व त्यानंतर उर्वरित अतिरीक्त विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

06) शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये प्रथम वर्षात किंवा व्दितीय वर्षात प्रवेशित असलेले विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याला त्या महाविद्यायात अनुक्रमे व्दितीय व तृतीय वर्षात (विद्यार्थ्यास आवश्यक असलेल्या विशेष विषयाकरीता) त्या महाविद्यालयात प्रवेश देणे बंधनकारक राहील.

07) एखाद्या महाविद्यालयात व्दितीय वर्ष विज्ञान (एस.वाय.बी.एस्सी) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास त्याच महाविद्यालयात हव्या असलेल्या विशेष विषयाची सुविधा नसेल, अशा विद्यार्थ्यास ज्याठिकाणी सदर विषयाची सुविधा आहे अशा विद्यापीठाशी संलग्नीत अन्य महाविद्यालयात तृतीय वर्षास विशेष विषयासाठी प्रवेश घेता येईल. मात्र सदर विशेष विषयाची सुविधा व्दितीय वर्ष उत्तीर्ण झालेल्या महाविद्यालयात नाही असे हमीपत्र संबंधित माहविद्यालयाच्या मा.प्राचार्याकडून घेवून ज्या महाविद्यालयास विशेष विषयासाठी प्रवेश घ्यावयाचा आहे त्या महाविद्यालयातील मा.प्राचार्यांकडे सादर करणे बंधनकारक राहील.

08) एखाद्या महाविद्यालयात प्रथम वर्ष (एफ.वाय.बी.ए.) कला शाखेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास त्याच महाविद्यालयात व्दितीय वर्ष अभ्यासक्रमास हव्या असलेल्या विशेष विषयाची सुविधा नसेल, अशा विद्यार्थ्यांस विद्यापीठाशी संलग्नीत ज्या महाविद्यालयात सदर विषयाची सुविधा आहे अशा अन्य महाविद्यालयात व्दितीय वर्षास विशेष विषयासह प्रवेश घेता येईल. मात्र सदर विशेष विषयाची सुविधा प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेल्या महाविद्यालयात नाही असे संबंधित महाविद्यालयाच्या मा.प्राचार्याचे हमीपत्र घेवून ज्या महाविद्यालयात विशेष विषयासाठी प्रवेश घ्यावयाचा आहे त्या महाविद्यालयातील मा.प्राचार्यांकडे सादर करणे बंधनकारक राहील.

09) दिलेले प्रवेश हे मंजूर विद्यार्थी संख्ये व्यतिरीक्त जास्तीचे राहतील, व त्यासाठी विद्यापीठ नियमानुसार अतिरीक्त तुकडी समजली जाणार नाही. अतिरीक्त तुकडी घ्यावयाचे असल्यास शासनाकडे नव्याने प्रस्ताव विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे निर्धारित वेळेत सादर करण्यात यावेत.

10) वर नमूद केल्याप्रमाणे एखाद्या महाविद्यालयात प्रथम/व्दितीय वर्ष अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थी शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये उत्तीर्ण होवून शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये अनुक्रमे व्दितीय व तृतीय वर्षात प्रवेशित होत असतील तर त्या विद्यार्थ्यांना सदर महविद्यालयांनी प्रवेश द्यावयाचे आहेत. सदर विद्यार्थ्यांची गणना अतिरीक्त विद्यार्थी संख्येमध्येच करण्यात यावी.

...3..

11) वाढीव विद्यार्थी प्रवेशित झाल्यानंतर शैक्षणिक गुणवत्ता ढासळणार नाही यासाठी महाविद्यालयाने आवश्यक त्या मूलभूत सोयीसुविधा उदा. वर्गखोल्या, प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक प्रयोगशाळा, उपकरणे, ग्रंथालयातील पुस्तके इ. पूर्तता करणे बंधनकारक राहील. तसेच विद्यापीठ परिनियम 415(1) नुसार आवश्यक शिक्षक पदे भरणे आवश्यक राहील तसेच सदर बाबींची पूर्तता न केल्यास किंवा विद्यार्थ्यांकडून काही तक्रार प्राप्त झाल्यास, त्या बाबतची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाची राहील.

12) महाविद्यालयास मंजूर करण्यात येत असलेल्या अतिरीक्त/वाढीव प्रवेश संख्या ही महाविद्यालयामधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी उपलब्ध असलेला शिक्षक वर्ग हा परीक्षेशी संबंधित सर्व कामकाजामध्ये सहभागी राहील या आशयाचे प्राचार्यांचे स्वाक्षरीचे स्वतंत्र हमीपत्र प्रस्तावा सोबत सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे. **जी महाविद्यालये या अटीची पूर्तता करणार नाही त्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी कोणत्याही सबबीवर वाढीव प्रवेश मान्य करण्यात येणार नाहीत याची प्रकर्षाने नोंद घ्यावी.**

उपरोक्त बाबींची नोंद घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
**Sd/-**
**(जी.एन.पवार)**
सहा.कुलसचिव
(संलग्नता विभाग)

**प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:-**

1) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि., जळगांव.
2) मा.उपकुलसचिव/सहा.कुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग, कबचौउमवि., जळगांव.
3) मा.संगणक केंद्र प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग, कबचौउमवि., जळगांव.
4) मा.सहा.कुलसचिव, अभ्यासमंडळे व प्रवेश पात्रता विभाग, कबचौउमवि., जळगांव.

आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालयांचे पात्रता/परीक्षा अर्ज स्विकारतांना महाविद्यालयांनी प्रवेशित केलेल्या अतिरीक्त विद्यार्थी संख्येसाठी रक्कम भरली असल्याची खातरजमा आपल्या स्तरावर करावी.

**5) समन्वयक, विद्यार्थी ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगांव.**

आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालयांनी अतिरीक्त विद्यार्थ्यांचे अतिरीक्त संलग्नता शुल्क संलग्नता विभागामार्फत वित्त विभागात जमा केल्यानंतर वाढीव प्रवेशा बाबतची माहिती आपणास वेळोवेळी कळविण्यात येईल व त्यानंतरच सदरचे वाढीव प्रवेशांची नोंद करण्याची सुविधा संबंधित महाविद्यालयांना उपलब्ध करुन देण्यात यावी,

**प्रतिलिपी:-**

1) मा.कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ. उ.म.वि., जळगांव.
2) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव
3) मा.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ. उ.म.वि., जळगांव.
4) मा.वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ. उ.म.वि., जळगांव.